**सत्र खटला क्र. 87/2014**

**सरकार वि. राजा उर्फ गौस अली व इतर.**

**निशानी क्र.89.**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.3 यांची जबानी**

**मी याद्वारे शपथेवर सांगतो की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | राजु मोतीलाल शाहु. |
| वय | – | ५३ वर्ष |
| व्यवसाय | – | खाजगी व्यवसाय. |
| पत्ता | – | बिनाकी मंगळवारी, पंचवटी नगर, नागपुर. |

**<u>सरतपासणी सहा. सरकारी वकिल कु. गवळी मार्फत शपथेवर सुरु</u>** –

1. धंतोली पेलिसांनी मला पंच म्हणुन काम करण्याकरीता बोलविले नव्हते. असे घडले नाही की, आरोपी गौस अली उर्फ राजा याने माझे समक्ष पोलिसांना कबुल जबाब निवेदन दिले होते. असे घडले नाही की, त्याने गुन्हयात वापरलेली गाडी कुठे ठेवली हे पोलिसांना सांगितले होते. आता मला जे निवेदन दाखविले त्यावर माझी सही आहे. आता मला जो जप्ती पंचनामा दाखवला त्यावर देखील माझी सही आहे. माझी सही मी केव्हा केली हे मला आठवत नाही.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षाच्या कथनास सहायता करीत नसल्याने सहा. सरकारी वकीलांनी उलट तपासासारखे प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी मंजुर. उलटतपासणी सहा. सरकारी वकिल मार्फत –</u>**

2. हे म्हणणे खरे नाही की, दि.१८.०२.२०१३ रोजी पोलिसांनी मला धंतोली पोलिस स्टेशन येथे बोलविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी गौस अली याने पोलिसांना माझे समक्ष निवेदन दिले की त्याने गुन्हे करण्याकरीता वापरलेली गाडी सत्येंद्र गुप्ता याचे घरी आजरी माजरी, यशोधरा नगर येथे लपवुन ठेवली आहे व ते तो काढुन द्यायला तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी त्याचे निवेदन लिहुन घेतले व त्यावर आरोपीची सही घेतली आणि त्यावर मी देखील सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने आम्हाला पंचांना व पोलिसांना आजरी माजरी येथे नेले आणि सत्येंद्र गुप्ता यांचे घराजवळ असलेली गाडी डिस्कवर मोटर सायकल काढुन दिली. पोलिसांनी तिथे आमच्या समक्ष जप्ती पंचनामा तयार केला आणि त्यावर आम्ही पंच

आणि त्यावर आम्ही पंच आणि आरोपी यांनी सहया केल्या. वरील सर्व कागदपत्र मला दाखविले त्यावर माझ्या सहया आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी कोर्टासमोर हजर आहे व मी त्याला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या भागातले रहिवासी असल्यामुळे त्यांना वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपासणी आरोपींचे वकिल श्रीमती एम.एम.जयसिंघानी मार्फत – नाकारली.**

**फेरतपासणी – नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

नागपूर
दि.04.05.2026.

(एम.एस.गणोरकर)
अति. सत्र न्यायाधिश – 6,
नागपूर.